# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- २१/०२/२०१८

## मालेगाव शहरातील मोबाईल दुकाने फोडणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात

---

मालेगाव शहरात गतवर्षी, माहे नोव्हेंबर मध्ये रौनकाबाद येथील रहिवासी श्री. अजूमोद्दीन शरिफोद्दीन शेख यांचे जामा मस्जीद परिसरातील ताज मोबाईल शॉपचा पत्रा उचकावुन कोणीतरी अज्ञात चोरीटयांनी शॉपमध्ये विक्रीस असलेले विविध कंपन्यांचे मोबाईल फोन व ॲक्सेसरीज घरफोडी चोरी करून नेले होते. सदर बाबत मालेगाव किल्ला पोलीस ठाणेस I गुन्हा रजि.नं. ७०/२०१७ भादवि कलम ४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. मालेगाव शहरातील मोबाईल दुकानांमध्ये होणारे चोरीचे गुन्हयांचा स्थानिक गुन्हे शाखेचे पथकामार्फत समांतर तपास सुरू होता.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो** यांनी मालेगाव शहरातील वाढते घरफोडी, चोरीचे गुन्हे तसेच मोबाईल दुकानांमध्ये होणारे चोरीचे गुन्हयांचा सविस्तर आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन व सुचना दिलेल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी मालेगाव शहर तसेच शहरालगतचे तालुक्यांमधील मोबाईल दुकाने फोडणारे गुन्हेगारांची गुन्हा करण्याचे पध्दतीवरुन मिळविलेल्या गुप्त माहितीचे आधारे सदर गुन्हयांमधील चोरीस गेलेले मोबाईल हे मालेगाव शहरातील काही इसम कमी किंमतीचे भावात मालेगाव शहरात विक्री करत असले बाबत समजले. त्याप्रमाणे दिनांक २०/०२/२०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे मालेगाव पथकातील अधिकारी व कर्मचारी हे मालेगाव शहरातील नवीन बसस्थानक परिसरात गस्त घातल असतांना मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे इसम नामे **१) फिरोज वहाब शेख, रा.अख्तराबाद, लकी हॉटेलसमोर, मालेगाव** यास शिताफिने ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात तसेच त्याचे हातातील पिशवीमध्ये **व्हिवो, लाव्हा, कार्बन, इंटेक्स, मायक्रोमॅक्स, सॅमसंग, फ्रेंड** अशा विविध कंपन्यांचे **एकुण ३० मोबाईल हॅण्डसेट** हस्तगत करण्यात करण्यात आले. सदर मोबाईल बाबत त्यास विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने त्याचा साथीदार नामे **२) अकबर मोहमद शेख, रा. आयेशानगर, सुपरकॉलनी, मालेगाव** याचेसह सुमारे ०३ ते ०४ महिन्यांपुर्वी नांदगाव येथील फरची पुलावरील **मोबाईल दुकान फोडल्याची कबुली दिली आहे.** सदर बाबत **नांदगाव पोलीस ठाणेस I गुन्हा रजि.नं. २३०/२०१७ भादवि कलम ४६१,३८०** प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयातील फिर्यादी श्री. शंकर भगवान शिंदे, रा.कैलासनगर, नांदगाव यांचे नांदगाव येथील फरची पुलावरील ओम टेलिकम्युनिकेशन मोबाईल शॉप हे अज्ञात आरोपीतांनी फोडले होते. वरील आरोपींपैकी ताब्यात घेतलेला आरोपी नामे फिरोज शेख याने कबुली दिलेवरून **सदर गुन्हा उघडकीस आलेला** असुन त्याचे साथीदाराचा शोध स्थागुशाचे तपासपथक करीत आहे.

तसेच वरील गुन्हयातील ताब्यात घेतलेला आरोपी नामे फिरोज शेख यास अधिक विश्वासात घेवुन चौकशी केली असता, मालेगाव शहरातील पवारवाडी परिसरात इसम नामे इकबाल महंमद शेख हा चोरीचे मोबाईलची विक्री करतो बाबत समजले वरून स्थागुशाचे मालेगाव पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी रात्रीचे सुमारास इसम नामे **३) इकबाल महंमद शेख, रा. सैय्यद नगर, पवारवाडी, मालेगाव** यास ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात नोकिया, मॅक्सकिंग व मिडो कंपनीचे एकुण ०४ मोबाईल हॅण्डसेट व रोख २७०० रू. मिळुन आले.

ताब्यात घेतलेला वरील आरोपी इकबाल महंमद शेख यास जप्त मोबाईल फोन बाबत विचारपुस करता त्याने सदर मोबाईल फोन हे त्याचे वरील साथीदारांसह जामा मस्जीद परिसरात गुळबाजारातील मोबाईल दुकान फोडुन चोरले असल्याची कबुली दिली आहे. वरील आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांचेकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. सदर आरोपीतांचे कब्जातुन **एकुण ३४ मोबईल फोन व रोख रूपये असा एकुण ७०,७११/- रू. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत** करण्यात आला असुन ०२ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आलेले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, सपोनि संदिप दुनगहू**, सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा राजु मोरे, वसंत महाले, सुहास छत्रे, पोना राकेश उबाळे, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम अशा पथकाने सदर कामगिरी केली आहे.